DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्र.०२४७२-२२७३०१ Email id:- rdc1osmanabad@gmail.com फॅक्स क्र.०२४७२-२२८०१८

संदर्भ:- १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५
२. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७
३. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४
४. महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम २०२०
५. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८ /आरोग्य ५दिनांक १४ मार्च २०२०
६. महाराष्ट्र महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांची अधिसूचना दिनांक १३/०४/२०२०
७. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्रमांक DMU/२०२०/CR-९२/DISM-१/ दिनांक १३/०४/२०२०
८. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र.४०/-३/२०२०-डीएम-१ (ए) दिनांक १४ /०४/ २०२०
९. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र.४०/-३/२०२०-डीएम-१ (ए) दिनांक १५ /०४/ २०२०
१०.या कार्यालयाचे आदेश क्रमांक २०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दिनांक १५/०४/२०२०
११.महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, यांचे आदेश क्रमांक अधिसूचना क्रमांक DMU/२०२०/CR-९२/DISM-१/ दिनांक १७/०४/२०२०
१२. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, यांचे आदेश क्रमांक अधिसूचना क्रमांक DMU/२०२०/CR-९२/DISM-१/ दिनांक ०२/०५/२०२०
१३. या कार्यालयाचे आदेश क्रमांक २०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दिनांक ०४/०५/२०२०

---

जा.क्र.२०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दि.०९/०५/२०२०

**विषय:-** उस्मानाबाद जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत

**सुधारित आदेश:-**

संदर्भ क्रमांक १ अन्वये जिल्हाधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजारावर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १३ अन्वये उस्मानाबाद जिल्हयात करोना विषाणूचा प्रादुर्भाव (कोव्हिड १९) रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी रोखण्यासाठी उस्मानाबाद जिल्हयातील सर्व दुध केंद्रे, भाजीपाला केंद्रे व भाजीपाला फिरते विक्रेते, कृषी विषयक बि-बियाणे, खते केंद्रे व कृषी अवजारे, स्पेअरपार्टसची दुकाने व इत्यादी सर्व खाजगी आस्थापना या ठराविक कालावधीतच चालु ठेवणेबाबत आदेश पारित केला आहे.

नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी संदर्भ क्र. १३ चे आदेशात सुधारणा करणे आवश्यक वाटत असल्याने मी दिपा मुधोळ- मुंडे, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण उस्मानाबाद संदर्भ क्र. १३ चे आदेशातील मुद्दा क्र. १ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.



Scanned by CamScanner

१. किराणा दुकाने व सर्व आस्थापना सोमवार ते शनिवार या दिवशी सकाळी ०८.०० ते दुपारी ०२.०० या कालावधीत चालू राहील. मुख्य बाजारपेठेमध्ये नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी तसेच वाहतूकीस अडथळा होऊ नये म्हणून मुख्य बाजारपेठेकडे जाणा-या सर्व रस्त्यांवर चारचाकी वाहनांच्या वाहतूकीस मनाई (No Entry) असेल.

संदर्भ क्र. १३ चे आदेशात केलेल्या वरिल सुधारणेव्यतिरिक्त मूळ आदेशातील इतर बाबी जशास तशा यापुढेही लागू असतील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२० चे नियम ११ नुसार भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतुदीनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेश दिनांक १७ मे, २०२० पर्यंत लागु राहील.

सदर आदेश दिनाक ०९/०५/२०२० रोजी माझ्या सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
उस्मानाबाद

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रतिलिपी, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद
२. पोलिस अधिक्षक, उस्मानाबाद यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
३. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
४. जिल्हा शल्य चिकीत्सक, उस्मानाबाद
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. उस्मानाबाद
६. जिल्हा प्रशासन अधिकारी, न.पा.प्र.जि.का. उस्मानाबाद
७. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद
८. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा.पं./स्वच्छता व पाणीपुरवठा जि.प. उस्मानाबाद
९. उपविभागीय दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१०. तालुका दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
११. गट विकास अधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१२. मुख्याधिकारी, नगर पालिका, उस्मानाबाद, तुळजापूर, नळदुर्ग, उमरगा, लोहारा, मुरुम, भुम, परंडा, वाशी,कळंब यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

9/5/20

जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
उस्मानाबाद

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner